# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २०० वा शनिवार दि.६ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## आघाडीचे जागावाटप झाल्यानंतर वंचित आपला निर्णय घेणार!



मुंबई : (प्रतिनिधी) महाविकास आघाडीतील तीन्ही घटक पक्षांमधील जागावाटपाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. तीन्ही पक्षांतील जागावाटपात शिवसेनेला किती जागा मिळणार, कोणत्या मिळणार याची स्पष्टता आल्यानंतर वंचित बहुजन आघाडी शिवसेनेसोबत जागावाटपाची चर्चा करेल असे स्पष्टीकरण वंचितने केले आहे.आघाडीतील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली असून ती लवकरच पूर्ण होईल. तसेच वंचित बहुजन आघाडी हे महाविकास आघाडीतीलच घटक पक्ष आहे, या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर वंचितने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. वंचितला अद्याप महाविकास आघाडी किंवा इंडियामध्ये अद्यापही आमंत्रित करण्यात आलेले नाही. मात्र शिवसेना पक्ष महाविकास आघाडी आणि इंडियाचा घटक पक्ष आहे. अशा परिस्थितीमध्ये जोपर्यंत आघाडीच्या तिन्ही घटक पक्षांचे आपापसात जागावाटप होत नाही तोवर आम्हाला शिवसेनेबरोबर जागा वाटप करता येणार नाही. त्यामुळे तीन्ही पक्षांनी आपापसात जागावाटप केल्यास वंचित आणि शिवसेनेचा आपापसात जागावाटपाचा मार्ग मोकळा होईल असे वंचितचे मुख्य प्रवक्ते तथा उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे यांनी म्हटले आहे.

## सरकारी निवासस्थानी ६.५ कोटींचे जेवण!




मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'वर्षा' आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' या सरकारी निवासस्थानी येणा-या लोकांच्या खानपान सेवांसाठी वर्षभरात करण्यात येणा-या खर्चाबाबतची माहिती समोर आली आहे. दहा महिन्यांपूर्वी या दोन सरकारी बंगल्यावर मान्यवर अतिथींच्या खानपान सेवांसाठी पुरवठादार निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानासाठी आता वार्षिक दीड कोटी रुपयांवर एका केटररची नियुक्ती केली आहे. यासोबत देवेंद्र फडणवीस यांच्या बंगल्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या बंगल्यासाठी साडेतीन कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे.काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' येथील पाहुणचारावर सरकारला कोट्यवधी रुपये खर्च करत असल्याची टीका विरोधकांकडून केली आहे. राज्यात शिंदे आणि फडणवीस सरकार आल्यानंतर मंत्रालय आणि सरकारी निवासस्थानांवर गर्दी होत होती. याचा सरकारी तिजोरीवर परिणाम होत असल्याचे म्हटले जात होते. आरटीआयच्या माहितीनुसार, सरकार स्थापन झाल्यापासूनच्या चार महिन्यांत मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी केटरिंग सेवेवर २ कोटी ३८ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे समोर आले होते.राज्य सरकारने एप्रिल २०२५ पर्यंत 'देवगिरी' या अजित पवारांच्या शासकीय निवासस्थानासाठी छत्रधारी केटरर्सची नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता 'वर्षा', 'सागर' आणि 'देवगिरी' या तीनही बंगल्यांवर खानपानाचा एकूण खर्च वर्षाला सुमारे ६.५ कोटी रुपये असणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे एप्रिल २०२३ मध्ये विरोधात असताना अजित पवार यांनीच मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर केवळ चार महिन्यांत खानपानावरील खर्च तब्बल २.६८ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे म्हटले होते.गेल्या वर्षी, राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने मुख्यमंत्री शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी खानपानाची व्यवस्था करण्यासाठी छत्रधारी केटरर्स आणि श्री सुख सागर हॉस्पिटॅलिटीची नियुक्ती करणारा जीआर जारी केला होता. त्यानंतर आता अजित पवार यांच्या 'देवगिरी' बंगल्यावर देखील छत्रधारी केटरर्समार्फत पाहुणचार केला जाणार आहे.'देवगिरी' बंगल्यावर या केटरर्समार्फत ४४ वस्तू पुरवल्या जाणार आहेत ज्यात गरम आणि थंड पेये आणि स्नॅक्सचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्रीयन कचोरी (१५ रुपये), साबुदाणा वडा (१५ रुपये), दही वडा (१५ रुपये), वडा सांबर आणि टोमॅटो ऑम्लेट (२८ रुपये), मसाला डोसा (२० रुपये) आणि व्हेज आणि चिकन सँडविच (१८-२० रुपये) मिळणार आहे. तसेच शाकाहारी आणि मांसाहारी थाळी (७५ आणि ९८ रुपये), शाकाहारी आणि मांसाहारी चिकन आणि मटण बिर्याणी (२५ आणि ३५ रुपये) आणि बुफे (१६० रुपये) हे पदार्थ देखील पुरवले जाणार आहेत.दरम्यान, 'वर्षा' आणि 'सागर' बंगल्यावर येथे समान दर लागू आहेत. तसेच जर खाद्यपदार्थ मान्य केलेल्या दरांव्यतिरिक्त इतर दराने विकले गेले, तर त्याचे बिल मंजूर केले जाणार नाही, असे जीआरमध्ये म्हटले होते.

## रोहित पवार यांच्या कंपनीवर ईडीची छापेमारी



पुणे : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार आणि शरद पवार यांचे खंदे समर्थक असलेले रोहित पवार अडचणीत आले आहेत. आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीशी संबंधित ठिकाणांवर अंमलबजावणी संचालनालयाने छापेमारी सुरू केली आहे. शुक्रवारी पुणे, बारामती आणि इतर ठिकाणी ईडीकडून छापेमारी करण्यात आली. ईडीच्या पथकाने एकूण ६ ठिकाणी छापेमारी सुरु केल्याची माहिती मिळाली आहे. ईडीने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ही कारवाई केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये बंड झाले. अजित पवार यांनी शरद पवार यांची साथ सोडली. अजित पवार भाजपसोबत गेले. अजित पवार यांच्यासोबत सुमारे ४० पेक्षा जास्त आमदार गेल्याचा दावा केला जात आहे. त्यानंतर शरद पवार यांच्याकडे मोजके आमदार राहिले. यावेळी शरद पवार यांची बाजू भक्कमपणे रोहित पवार आणि सुप्रिया सुळे यांनी सांभाळली. आता रोहित पवार पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत. यापूर्वी बारामती ॲग्रो कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण विभागाने नोटीस दिली होती. ७२ तासांत प्लँट बंद करण्याची सूचना नोटीसमध्ये दिली होती. त्यावेळी आमदार रोहित पवार यांनी स्वत: ट्वीट करत मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात ही माहिती दिली होती. त्यानंतर उच्च न्यायालयातून त्यांनी स्थगिती मिळवली होती.रोहित पवार हे बारामती ॲग्रो कंपनीचे सीईओ आहेत. आता अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. यामुळे बारामती ॲग्रो कंपनीच्या संबंधित लोकांच्या घरी छापेमारी सुरू करण्यात आली आहे. रोहित पवार यांचे काका अजित पवार हे सत्तेत आहेत. राज्याचे ते उपमुख्यमंत्री आहेत. त्यावेळी पुतण्याच्या कंपनीवर छापेमारी केली जात आहे. या प्रकरणात रोहित पवार किंवा त्यांच्या पक्षातील एकाही नेत्यांकडून प्रतिक्रिया अद्याप आली नाही.

## आझाद मैदानासाठी मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष ?




मुंबई : मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील हे येत्या २० जानेवारीपासून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. मराठा समाजाच्या वतीने आझाद मैदानामध्ये आंदोलन करण्यात येणार आहे. परंतु याच मैदानाच्या मागणीवर ओबीसी समाजदेखील ठाम आहे. त्यामुळे मैदानासाठी मराठा-ओबीसी संघर्ष होऊ शकतो.मराठा समाजाच्या वतीने आझाद मैदान, बीकेसी मैदान आणि शिवाजी पार्कवर आंदोलनाची तयारी सुरू करण्यात आली आहे. मागच्याच आठवड्यात मराठा शिष्टमंडळाने तिन्ही मैदानांची पाहणी केली. मात्र आझाद मैदानासाठी ओबीसी समाज आग्रही आहे. ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी आधीच आझाद मैदानासाठी पोलिसांना पत्र दिल्याची माहिती आहे.आता पोलिस काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे. तीन कोटी लोक मुंबईत येतील, असा दावा मराठा समन्वयकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे तिन्ही मैदानं आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. मात्र ओबीसी समाजाच्या नेत्यांनीही २० तारखेला आंदोलनाची हाक दिली आहे.मराठा समाजाचा सरसकट ओबीसी प्रवर्गात समावेश करावा, त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अशी मनोज जरांगे यांची मागणी आहे. सगेसोय-यांना आरक्षण मिळावे, ही एक प्रमुख मागणी पुढे आली आहे. त्यामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला आहे.दरम्यान, गुरुवारी शिर्डी येथे कार्यकर्ता मेळाव्यामध्ये बोलताना शरद पवारांनी येत्या चार ते आठ दिवसांमध्ये सरकार आरक्षणासंदर्भात मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले होते. सरकारनेच जरांगेंना लेखी दिल्यामुळे अडचण निर्माण केल्याचेही पवारांनी स्पष्ट केले आहे.

## भाजपच्या लातूर शहर केमिस्ट फार्मासिस्ट आघाडीच्या जिल्हा संयोजकपदी जयप्रकाश मुकुंद रेड्डी यांची यांची निवड



लातूर : भाजपच्या लातूर शहर केमिस्ट फार्मासिस्ट आघाडी जिल्हा संयोजकपदी जयप्रकाश मुकुंद रेड्डी यांची यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. तसेच आपण आपल्या संघटन कौशल्याने लातुर शहर जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचे संघटन वाढविण्यासाठी अथक परिश्रम कराल ही अपेक्षा भाजपचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे यांनी यावेळी व्यक्त केली आहे. सदर नियुक्ती पत्र जयप्रकाश मुकुंद रेड्डी यांना देतेवेळी भाजप मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे, भाजप महाराष्ट्र प्रदेश, उपाध्यक्ष डॉ. अजित गोपछडे, भाजप लातूर जिल्हा प्रभारी किरण पाटील, लातूर मनपाचे भाजपचे माजी नगरसेवक रवि सुडे, महिला आघाडी प्रमुख सौ. मीनाताई भोसले, केमिस्ट संघटनेचे सहसचिव अकुंश भोसले, संघटन सचिव नागेश स्वामी, सुरेंद्र सुत्रावे, ॲड. प्रदीप मोरे तसेच लातूर शहरातील केमिस्ट संघटनेचे व भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरण ; बारा दिवसांमध्ये अंतिम निर्णय येणार?



मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून बंड करत भाजपला सोबत घेऊन सरकार स्थापन केले. त्यामुळे शिवसेना आमदारांवर अपात्रतेची कारवाई करावी, अशी याचिका विधानसभा अध्यक्षांकडे प्रलंबित आहे. त्या प्रकरणात तारखांवर तारखा सुरू आहेत. आता राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीचे वेळापत्रक ठरले आहे.२ जुलै रोजी अजित पवारांनी पक्षातल्या आमदारांना सोबत घेऊन मंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवारांसह अजित पवार गटाचे ९ आमदार मंत्री झाले. शिवाय चाळीसपेक्षा जास्त आमदार अजित पवारांसोबत गेले. त्यामुळे शरद पवार गटाकडून विधानसभा अध्यक्षांकडे आमदार अपात्रता प्रकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली.

## विमानतळाना संभाजी महाराज, दि. बा.पाटील नाव कधी देणार!

मुंबई : (प्रतिनिधी) अयोध्येतील विमानतळाचे महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण करण्यात आले. त्याचे स्वागतच आहे. आता त्याच धर्तीवर औरंगाबाद विमानतळाचे छत्रपती संभाजी महाराज विमानतळ आणि नवी मुंबईतील विमानतळाचे दि. बा.पाटील विमानतळ असे नामकरण करावे अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय नागरी विमान उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.अयोध्येतील विमानतळाला महर्षी वाल्मिकी यांचे नाव देण्यात आले. गोव्यातील मोपा येथील विमानतळाला गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचे नाव देण्यात आले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात आम्ही औरंगाबादच्या विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज यांचे तर नवी मुंबईतील विमानतळाला दी.बा.पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला होता. तशी शिफारस केंद्राला करण्यात आली होती. पण कोणत्या व्यक्तीच्या नावावरून नव्हे तर संबंधित शहराच्या नावावरून नाव देण्याचे सरकारचे धोरण असल्याचे सांगण्यात आले. पण आता ही दोन नावे व्यक्तींची देण्यात आली आहेत. हे पाहून आम्हाला आनंदच झाला. या दोन विमानतळांना लागू होणारे नियम महाराष्ट्रातील दोन विमानतळना लागू होतात का हे पाहण्याची आम्हाला उत्सुकता असल्याचे उद्धव ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे. महाराष्ट्राला गेल्या दशकभरात सातत्याने अन्यायकारक वागणुकीचा सामना करावा लागला आहे. आतातरी या दोन विमानतळाच्या नामकरणाची प्रक्रिया वेगाने करावी अशी विनंती उद्धव ठाकरे यांनी पत्राद्वारे केली आहे.


## हॉटेलमध्ये मित्रांसोबत चहा पित असताना तरुणास चाकूने भोसकले

छत्रपती संभाजीनगर : जिन्सी परिसरात नववर्षाच्या सुरूवातीलाच खुन झाला. हॉटेलमध्ये मित्रांसोबत चहा पित असलेल्या तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. साजेब खान शकिल खान (२२, रा. गल्ली क्रं. १५, बायजीपुरा) असे मृत तरुणाचे नाव आहे. तर त्याच्यासोबतच्या मित्रावरही मारेकऱ्याने चाकूने वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी दुपारी ४ वाजता बायजीपुऱ्यात ही घटना घडली.

साजेब मित्र सय्यद फैजल सय्यद शायकत (२२, रा. अल्तमश कॉलनी) याच्यासोबत शुक्रवारी दुपारी घराजवळीच एका चहाच्या हॉटेलमध्ये गेला होता. गप्पा मारत असतानाच तेथे त्याच्याच परिसरात राहणारा एक तरुणाने जात थेट शिविगाळ केली. काय झाले हे कळायच्या आतच मारेकऱ्याने खिशातून चाकू काढून साजेबवर वार केले. यात साजेब गंभीर जखमी होऊन खुर्चीवरुन खाली कोसळला. त्याच्यावरील वार थांबवण्यासाठी धावलेल्या सय्यद फैजलवर देखील मारेकऱ्याने वार केले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या साजेबला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार सुरु केले. मात्र, काही वेळातच त्याचा मृत्यू झाला. खोल जखम व अतिरक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**आरोपीच्या शोधासाठी दोन पथके रवाना**

घटनेची माहिती कळताच निरीक्षक रामेश्वर गाडे, सहायक निरीक्षक अनिल मगरे, उपनिरीक्षक रोहित गांगुर्डे यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी परिसरातीच असल्याचे कळाल्यानंतर दोन पथके त्याच्या शोधासाठी रवाना झाले. तर जखमी सय्यद फैजलला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याचा देखील पोलिसांनी जबाब नोंदवला.



## संपादकीय....

# म्हणून अभिनंदन!

सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाचे त्रिवार अभिनंदन. हे सर्वोच्च न्यायालय इस्रायलचे. तेथे लोकशाही आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या नेत्यांस दोन घटकांचा मोठा अडथळा वाटत असतो.थीळीींशप लू लोकसत्ता टीम.. सरकारी निर्णयांची घटनात्मकता तपासण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास असायलाच हवेत, असेच न्यायपालिकेचे मत पडले– अर्थात इस्रायलच्या. आणि ते त्यांनी नावानिशी नोंदवले..

सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाचे त्रिवार अभिनंदन. हे सर्वोच्च न्यायालय इस्रायलचे. तेथे लोकशाही आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या नेत्यांस दोन घटकांचा मोठा अडथळा वाटत असतो. एक म्हणजे प्रसार माध्यमे आणि दुसरी न्यायपालिका. त्या प्रमाणे इस्रायलचे विद्यमान पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनाही तसे वाटत असणार. पण त्यांचे दुर्दैव असे की ते स्वत:च्या देशातील माध्यमांच्या मुंडय़ा पुरेशा ताकदीने आवळू शकले नाहीत. वास्तविक त्यांस इस्रायलच्या यहुदी धर्मप्रेमींचीही साथ आहे आणि त्यांच्या सरकारला कडव्या धर्मवाद्यांचा थेट पाठिंबा आहे. राजसत्तेची धर्मसत्तेशी इतकी बेमालूम हातमिळवणी झालेली असूनही त्या देशातील माध्यमे या दोघांस भीक घालण्यास तयार नाहीत. या माध्यमांविरोधात राष्ट्रद्रोह, देशविरोधी इत्यादी आरोप करून त्यांच्या मुसक्या आवळण्याची सोय नेतान्याहू यांस आहे किंवा काय, हे ठाऊक नाही. खरे तर पेगॅससससारखे अद्भुत सॉफ्टवेअर हीदेखील इस्रायलची निर्मिती. त्या देशातील पत्रकार, चळवळे, सामाजिक कार्यकर्ते, न्यायाधीश इत्यादींच्या मोबाइल फोनमध्ये हे पेगॅसस घुसवून त्यांच्यावर गुप्तपणे हेरगिरी करण्याचा मार्ग नेतान्याहू यांनी चोखाळला किंवा काय हेही कळण्यास मार्ग नाही. माध्यमांस शांत करण्यात अपयशी ठरलेल्या या पंतप्रधानांनी अखेर न्यायपालिकेस गप्प बसविण्याचा पर्याय शोधला. त्यातूनच स्वत:च्या सरकारच्या बहुमताचा आधार घेत सरकारी निर्णयांचा फेरविचार करण्याचे न्यायपालिकेचे अधिकार काढून घेण्याचा घाट त्यांनी घातला. इस्रायलच्या सर्वोच्च न्यायालयाने लोकनियुक्त वगैरे पंतप्रधानांचा हा निर्णयच बेकायदा ठरवण्याची हिंमत दाखवली. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे– अर्थातच त्या देशाच्या– मन:पूर्वक अभिनंदन. सक्षम लोकशाहीवर मनापासून प्रेम असलेल्यांस हा निर्णय खचितच कौतुकाचा वाटेल.सर्वोच्च न्यायालय वा अन्यही न्यायाधीशांपेक्षा जनतेतून निवडून आलेले प्रतिनिधी अधिक महत्त्वाचे असे नेतान्याहू मानतात. त्याचमुळे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे सभागृह सर्वोच्च न्यायालयास वरचढ असेल अशी घटनादुरुस्ती त्यांनी गतसाली आपल्या बहुमताच्या जोरावर मंजूर करवून घेतली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही निर्णय बदलण्याचा अधिकार इस्रायली प्रतिनिधीगृहास – म्हणजे 'क्नेसेट'ला – मिळाला. हे निर्णय बदलण्यासाठी १२० सदस्यांच्या क्नेसेटमधील फक्त ६१ प्रतिनिधींनी पंतप्रधानांसमोर मान तुकवली की झाले. साध्या बहुमताच्या जोरावरही सर्वोच्च न्यायालयाचा निकाल प्रतिनिधीगृह बदलू शकेल, असा अधिकार या निर्णयाद्वारे सरकारने स्वत:च्या हाती घेतला. इतकेच नव्हे. तर यापुढे सरकारने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचा फेरविचार करण्याच्या, तो निर्णय घटनेच्या तत्त्वाची पायमल्ली करीत असल्यास रद्दबातल करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांस नेतान्याहू यांनी यशस्वीपणे कात्री लावली. इस्रायलमध्ये न्यायाधीश नेमण्याची एक तटस्थ प्रक्रिया आहे. तीस अनुसरून स्वतंत्र यंत्रणेद्वारे न्यायाधीशांच्या नेमणुका केल्या जातात. नव्या निर्णयानुसार या यंत्रणेची गरज राहिली नाही. एखाद्या नोकरशहाप्रमाणे न्यायाधीश नेमणुकांचा अधिकारही प्रशासनाने स्वत:हाती घेतला. एका अर्थी न्यायपालिका पंतप्रधानांनी पूर्णपणे पंगू करून टाकली. 'आडमुठेशाही' या संपादकीयातून (२६ जुलै २०२३) 'लोकसत्ता'ने या निर्णयावर भाष्य केले होते आणि त्यात इस्रायलचा प्रवास लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे सुरू असल्याची भीती व्यक्त केली होती. ती प्रत्यक्षात येण्याचा धोका सर्वोच्च न्यायालयाने– अर्थातच इस्रायलच्या– टाळला. म्हणून तेथील सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन.या साऱ्यातील अत्यंत आश्वासक बाब म्हणजे बहुसंख्य यहुदी जनतेने पंतप्रधानांविरोधात कडकडीत निदर्शने केली. आपले सरकार एकाधिकारशाहीकडे निघालेले आहे, असेच अनेकांस वाटले आणि जुलैनंतर सुमारे तीन–चार महिने त्या देशात नेतान्याहूंविरोधात आंदोलने झाली. या घटनादुरुस्तीवर क्नेसेटमध्ये होणाऱ्या मतदानास विरोध करण्यासाठी संपूर्ण देशभरातून लाखो यहुदी स्त्री–पुरुष, युवा–वृद्ध नागरिक पायी तेल अविवकडे निघाले आणि नंतर त्यांनी आपल्या 'लोकशाही मंदिरा'स घेराव घातला. सदनाबाहेर आणि देशभरातील आंदोलक आणि सुरक्षा यंत्रणा यांच्यात चकमकी झडल्या. याची दखल नेतान्याहू यांचे तारणहार अमेरिकेचे अध्यक्ष बायडेनबाबांसही घ्यावी लागली यावरून या आंदोलनाची तीव्रता ध्यानात येईल. नेतान्याहू यांनी सवयीप्रमाणे याकडे दुर्लक्ष केले आणि बहुमताच्या जोरावर सदर घटनादुरुस्ती क्नेसेटमध्ये रेटली. इस्रायली माध्यमांनीही आपल्या पंतप्रधानांवर जळजळीत टीका केलीच आणि आघाडीच्या प्रमुख वर्तमानपत्रांनी तर त्यावेळी आपल्या अंकांचे पहिले पृष्ठ ठार काळय़ा रंगात कोरे छापले. अन्य कौतुकाचा मुद्दा म्हणजे इस्रायली लष्करानेही आपल्या पंतप्रधानांविरोधात खमकी भूमिका घेतली. विमानदळानेही सरकारी आदेशांचा भंग केला जाईल, असा इशारा दिला. इस्रायल म्हणजे आधी लष्कर आणि मग तो देश, हे वास्तव. त्यामुळे इस्रायली लष्कराच्या या भूमिकेने परिस्थिती इतकी स्फोटक झाली की आंदोलन हाताळण्यासाठी पंतप्रधान नेतान्याहू यांस राखीव दलास पाचारण करावे लागले. इस्रायल हा देश नवउद्यमींचीही गंगोत्री. जगातील अनेक नवनवे उद्योग तेथील भूमीत जन्मास आले. त्यामुळे 'स्टार्ट अप नेशन' याच नावे इस्रायल ओळखला जातो. तथापि आपल्या पंतप्रधानांविरोधात अनेक नवउद्यमींनी देशत्यागाचा इशारा दिला. काही तर गेलेही. इतक्या साऱ्या उत्पातानंतरही आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा असे काही नेतान्याहू यांस वाटले नाही. अखेर सर्वोच्च न्यायालयानेच– अर्थातच इस्रायलच्या– याची रास्त दखल घेतली आणि पंतप्रधानांच्या निर्णयांस केराची टोपली दाखवली. म्हणून त्या सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन.त्या देशाच्या पंतप्रधानांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप आहेत. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात निकाल अपेक्षित असून तो विरोधात गेल्यास तो रद्दबातल ठरवता यावा यासाठीच या घटनादुरुस्तीचा घाट त्यांनी घातला असे आरोप झाले. ते रास्तच. खरे तर एव्हाना तो लागलाही असता. पण आधी ही घटनादुरुस्ती आणि नंतर ७ ऑक्टोबरास 'हमास'ने केलेला नृशंस दहशतवादी हल्ला यामुळे ते प्रकरण मागे पडले. कोणत्याही संकटग्रस्त नेत्यांसाठी देशप्रेम, राष्ट्रवाद हा शेवटचा आसरा असतो. 'हमास'च्या निंदनीय कृतीमुळे नेतान्याहू यांस ही संधी मिळाली. हे युद्ध अधिकाधिक लांबवावे असा त्यांचा प्रयत्न आहे तो यामुळेच. देशावरील संकट, देश विरोधकांस धडा शिकविणे वगैरे भाषा चलनात आली की अन्य मुद्दे मागे पडतात.

# वृत्तपत्र समाजाचा आरसा असतो..

६ जानेवारी हा दिवस बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. पत्रकार दिन साजरा करताना दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेणे गरजेचे आहे. पहिली गोष्ट म्हणजे वर्तमानपत्र हे समाजाचा आरसा असतो. आणि समाजाचेच प्रतिबिंब वर्तमानपत्रात दिसायला पाहिजे. दुसरी गोष्ट माणूस किती दिवस जगला हे महत्वाचे नसते तो कसा जगला याला महत्त्व असते. या दोन गोष्टी जरी कळाल्या तरी पत्रकार दिन साजरा करण्याचे आणि स्वतः ला पत्रकार म्हणून घेण्याचे सार्थक होईल. हल्ली आपण अनेक दिवस साजरे करतो. परंतु त्या दिवसाचे महत्त्व कधीच समजून घेत नाही. हाताला काळा धागा बांधुन, गाडीला लिंबु मिरची बांधुन गाडी समोरून मांजर जाते म्हणून थांबणारा जर विज्ञान दिवस साजरा करत असेल तर तेथे निव्वळ हास्य निर्माण होऊन दिवसाचे महत्त्व कमी होते. पत्रकार दिवसाचे महत्त्व जर वाढवायचे असेल पत्र पत्रकारिता करताना पत्रकाराने निरपेक्ष राहुन वर्तमानपत्राला समाजाचा आरसा बनवला तरच पत्रकार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण पाक्षिक सुरू करून त्यामधुन समाजाचे प्रबोधन केले. तेव्हा च्या काळात रुढ असलेल्या वर्णव्यवस्था, जाती व्यवस्थेच्या विरोधात लिखाण करून समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी प्रबोधन केले. दर्पण हे मराठी भाषेतील पहिले पाक्षिक होते. लोकांना वाचणाची आवड नव्हती, जाहिराती काय असते हे माहित नव्हते, समाजात शिक्षण नव्हते तरीही एक पाक्षिक सुरू करून सामाजिक समस्या मांडून त्याला न्याय देण्याचे काम दर्पणच्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकर यांनी केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी जेव्हा वर्तमानपत्र सुरू केले तेव्हा अनेक सामाजिक समस्या होत्या, अंधविश्वास व अनिष्ट रुढींचे थैमान होते. विकृतीला संस्कृती मानले जायचे. अशी परिस्थिती असताना प्रवाहाच्या विरोधात जाऊन जांभेकर यांनी स्त्री दास्यत्व, सतीप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह अशा मानुसकी ला काळीमा फासणाऱ्या प्रथेला विरोध केला आणि या प्रथांचे जे लोक पोषण करून समाजाचे शोषण करत होते त्यांची झोप उडवून त्यांना या विषयावर सकारात्मक व बदलात्मक विचार करायला भाग पाडले. दर्पण वर्तमानपत्र आठ साडे आठ वर्ष चालले पण अनिष्ट रुढी परंपरा व विषमता जोपाहणाऱ्या व्यवस्थेला हलवून लोकहिताचे काम केले. जांभेकर यांनी मराठीत पहिले वृत्तपत्र सुरू केले म्हणून ते श्रेष्ठ ठरत नाहीत तर वृतपत्राच्या माध्यमातून त्यांनी केलेले सामाजिक काम व सामाजिक प्रश्नांना दिलेला न्याय श्रेष्ठ आहे म्हणून जांभेकर यांना वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. पत्रकार दिवस साजरा करताना आणि जांभेकर यांच्या फोटो ला हार अर्पण करताना अगोदर पत्रकार म्हणून आपली जबाबदारी समजून घेतली पाहिजे. कारण लोकशाही मध्ये पत्रकारीतेला चौथा स्तंभ म्हणून महत्वाची जबाबदारी पत्रकार अर्थात माध्यमांवर दिलेली आहे. लोकशाही मध्ये पत्रकार व त्यांचे वर्तमानपत्र अथवा वाहिनी यांना विषेश हक्क अधिकार व संरक्षण दिले आहे. आज लोक सुशिक्षित आहेत, जाहिराती देऊ शकतात, वर्तमानपत्र नियमित वाचु शकतात.



तरीही वर्तमानपत्र चालवणे अवघड झाले आहे पत्रकार म्हणून वावरताना पाहिजे तो मान सन्मान मिळत नाहीत याचे कारण असे कि मागील काही वर्षापासून प्रस्थापित वर्तमानपत्र व पत्रकारांनी स्वतः ची नैतिक भुमिका बदलून जनतेच्या समस्या मांडून जनतेचा आवाज बनायला पाहिजे होते पण ते जनतेचा आवाज न बघता सरकारचा आवाज बनून सरकारचे मत लोकांना सांगायला लागले. पण लोकांचे मत सरकारला सांगणारी पत्रकारिता कमकुवत झाली. हे कृत्य प्रस्थापित लोकांनी आणि वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया ने जरी केले असले तरी त्याचा फटका प्रामाणिक पत्रकारिता करणाऱ्या वर्तमानपत्र व पत्रकारांना बसला. यावर दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे सतीप्रथा, विषमता, अस्पृश्यता, बालविवाह ह्या समस्या होत्या. जांभेकर यांनी त्यावर आवाज उठवला आज शिक्षणाचे व्यापारीकरण, बेरोजगारी, धर्मांधता, खाजगीकरण, इव्हिएमचा सारख्या समस्या देशाला व लोकशाही ला उद्ध्वस्त करत आहेत. आरोग्य सुविधा व्हेंटिलेटरवर आहेत. राजकीय नेते लोकशाही ची थट्टा करून लोकमताची किंमत शुन्य करत आहेत. राजकीय भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. स्वायत्त संस्थाचा चुकिचा वापर भ्रष्ट लोकांना शुद्ध करून राजकीय सत्तेच्या चाब्या त्यांच्या कडे देत आहेत. बाईला नागवे करून धिंड काढली जात आहे आणि गाईच्या संरक्षणाच्या पोकळ गप्पा केल्या जात आहेत, शाळेच्या इमारती मोडकळीस आलेल्या असताना मंदिराच्या भव्य इमारतीचे कौतुक होत आहे. वरिल समस्येवर पत्रकार आणि वर्तमानपत्र यांनी समाजाची बाजु घेऊन समाजाचे प्रतिबिंब सरकारला दाखवणे आवश्यक असताना येथे उलटे होत आहे. पत्रकारिता नियमांच्या विरोधात काम करुन, लोकांच्या समस्येवर न बोलता राजकीय नेते, राजकीय पक्षाची गुलामी करून कोणालाही पत्रकार होता येणार नाही, अथवा पत्रकार दिन साजरा करण्याचा नैतिक अधिकार त्यांना असणार नाही. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण वर्तमानपत्र सुरू हे आठ साडेआठ वर्षे चालवले परंतु आज जवळपास दोनशे वर्षे होत आहेत तरीही दर्पण व बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव कायम आहे. बाळशास्त्री जांभेकर यांचे सर्व आयुष्य जेमतेम ३४ वर्षे होते. आज काही काही पत्रकारांना पत्रकारिता करून चाळीस चाळीस वर्षे होत आहेत. परंतु ते पत्रकार म्हणून सर्वसामान्य मानसाच्या मनात स्वतः चा आदर, सन्मान निर्माण तर करू शकले नाही परंतु पत्रकार म्हणून लोकमाणसात ते ओळखही तयार करू शकले नाही. बरेच नविन पत्रकार संपादक आपले वर्तमानपत्र सुरू करून प्रामाणिक पणे पत्रकारिता करून, पत्रकारीतेचे अस्तित्व व सन्मान कायम ठेवून लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी निरपेक्ष पत्रकारिता करत आहेत, वेगवेगळ्या समस्येंना सामोरे जाऊन ते पत्रकारीतेची नैतिक पातळी ढासाळू देत नाहीत. व्यवस्थेविरुद्ध, चुकिच्या गोष्टी विरुद्ध सतत आवाज उठवून लोकांचे प्रबोधन तर करत आहेत पण जनमानसात एक सन्मान ही निर्माण करत आहेत. जे पत्रकार किंवा वर्तमानपत्र खऱ्या अर्थाने समाजा आरसा बनत आहेत ते स्वाभिमानी व निर्भीड पत्रकार म्हणून उदयास येत आहेत. आणि असेच स्वाभिमानी पत्रकार व प्रसारमाध्यमांमुळे समाजात आशेचे किरण निर्माण होत आहे. नाहीतर प्रस्थापित प्रसारमाध्यमांकडे बघितले तर सर्व सामान्य लोकही आज मिडीया पत्रकार लाचार झाला आहे, विकल्या गेला आहे, मिडीया कडे स्वाभिमान उरलाच नाही, मिडीया सत्ताधारी लोकांच्या हातचे बाहुले बनले आहे. हे लोकांचे मत खोडून काढण्यासाठी पत्रकार दिनी स्वाभिमानी पत्रकार व प्रसार माध्यमांनी प्रतिज्ञा करून ती प्रतिज्ञा पुर्ण करण्यासाठी आपली पत्रकारीता केली तरच लोकांचा विश्वास पत्रकारीतेवर बसेल आणि लोकशाही वाचवण्यासाठी लोकांसोबत पत्रकार व प्रसारमाध्यमे यांचे योगदान असेल. जर समाज हिताचे योगदान दिले तरच कोणत्याही क्षेत्रात ठसा उमटवला जातो. जर स्वाभिमान नसेल, सर्वसामान्य लोकांबद्दल जिव्हाळा नसेल, राष्ट्रबांधनी साठी योगदान नसेल, विशिष्ट व चुकीची आणि भेदभावाच्या विचारावर आचरण असेल तर कितीही वर्ष काम केले, किती ही वर्षे जगले तरी किर्तीरुपाने कोणीच मागे राहणार नाही. पत्रकारिता तर एक शस्त्र आहे. समाजाचा सर्वांगीण विकास करून लोकशाही जतन करण्यासाठी प्रभावी माध्यम आहे. प्रसार माध्यमांनी लोकशाही मध्ये विरोधी पक्षाची भुमीका घेऊन सत्तेतील काम काजावर लक्ष ठेवणे आवश्यक असते. शासकीय योजना, ध्येय धोरणे हे लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम प्रसारमाध्यमांचे आहे. योजना व ध्येय धोरणे लोकहीताचे आहेत कींवा नाही हे जनता ठरवत असते आणि जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचवण्याचे काम प्रसारमध्यमातुन पत्रकार करत असतो. परंतु सध्याची परिस्थिती बघितली तर जनतेमध्ये जाऊन पत्रकारिता करणे, जनतेचे मत जानुन घेणे हेच बंद झालेले दिसत आहे. फक्त राजकीय अजेंडा राबवून जनतेला मुर्ख बनवण्यात धन्यता मानली जात आहे. थोडक्यात काय तर आजची प्रस्थापित पत्रकारिता चुकिच्या मार्गाने जाऊन स्वतः चा स्वाभिमान व अस्तित्व विसरली आहे. जे जिवंतपणी स्वतः चे अस्तित्व निर्माण करू शकले नाही ते मृत्यूनंतर काय अस्तित्व निर्माण करणार म्हणून आजही संधी आहे. नैतिकता, प्रामाणिक पणा जोपासून आपण आपली पत्रकारिता केली तर समाज नक्कीच सन्मान करेल. पत्रकार दिनानिमित्त का होईना बाळशास्त्री जांभेकर यांच्या कडे बघुन ते फक्त ३४वर्षे जगले पण लोकांच्या आठवणीत आहेत. आज ३४ वर्षाच्या व्यक्तीला आयुष्यात काय करायचे हेच माहिती नाही. पत्रकार दिन साजरा करताना किमान निरपेक्ष पत्रकार आणि समाजा आरसा असलेली पत्रकारिता हे जरी समजले तरी पत्रकार दिन साजरा झाल्याचा आनंद होईल.

------------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# 'सारथी'मार्फत महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण

राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी–मराठा व मराठा–कुणबी प्रवर्गातील लक्षित गटातील उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा अंतर्गत विविध पदावर काम करण्याची संधी मिळावी, यासाठी 'सारथी' संस्थेमार्फत पुणे येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग– महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी सामान्य प्रवेश परीक्षा आणि कागदपत्रे पडताळणीद्वारे दरवर्षी २५० उमेदवारांची करण्यात येते. या उमेदवारांना पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत, व्यक्तिमत्व चाचणी या तीन टप्याकरिता कोचिंगचे नियोजन करण्यात येते. राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी–मराठा, मराठा–कुणबी या प्रवर्गातील उमेदवार या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. यासाठी त्यांच्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेला जातीचा दाखला अथवा शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावाचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले नॉन–क्रिमीलेअर अथवा उत्पन्नाचे प्रमाणपत्र किंवा ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र आवश्यक आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयेपेक्षा जास्त नसावे. तसेच अर्जदाराने 'सारथी'मार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही उपक्रमांचा या अगोदर लाभ घेतलेला नसावा. इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी संस्थाकडून या प्रशिक्षणासाठी लाभ घेतलेला नसावा किंवा घेत नसावा.अर्जदाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता धारण केलेली असावी. सिव्हील अँड वॉटर मॅनेजमेंट, सिव्हील अँड एन्व्हायर्नमेंटल, स्ट्रक्चरल, कन्स्ट्रक्शन इंजिनिअरींग अथवा टेक्नॉलॉजी, सिव्हील आदी विषयातील बी.ई किंनिवा बी. टेक. अथवा सिव्हील विषयातील डिप्लोमा आणि एएमआयई पदवी उत्तीर्ण केलेली असावी. उमेदवाराचे वय किमान १९ वर्ष ते कमाल ३८ वर्ष असावे.

आवश्यक कागदपत्रे

जातीचा दाखला किंवा शाळेचा दाखल अथवा ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, नॉन क्रिमी–लेअर प्रमाणपत्र किंवा उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, अभियांत्रिकी पदवी प्रमाणपत्र, दहावी बोर्डचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखला, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि राष्ट्रीयकृत बकेचे पासबुक, चार पासपोर्ट आकाराचे फोटोप्रशिक्षणाचा कालावधी आणि टप्पे

पहिल्या टप्प्यात पूर्व परीक्षेसाठी अंदाजे तीन महिने किंवा महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षेचा घोषित दिनांक यापैकी जे अगोदर असेल त्या कालावधीपर्यंत प्रशिक्षण दिले जाते. दुसऱ्या टप्प्यात मुख्य परीक्षेसाठी ५ महिने किंवा महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षेचे घोषित दिनांक यापैकी जे अगोदर असेल त्या कालावधीपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल. तिसऱ्या टप्प्यात मुलाखत आणि व्यक्तिमत्व चाचणीसाठी अंदाजे दोन महिने किंवा मुलाखत अथवा व्यक्तिमत्व चाचणीच्या घोषित दिनांकापर्यंत प्रशिक्षण दिले जाते.

सारथी

"शाहू – विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

अशी आहे लाभार्थी निवड पक्रिया विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी लिंक, मार्गदर्शक सूचना, हमीपत्र व जाहिरात 'सारथी'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. याबाबतची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केली जाते. अर्जदाराची निवड 'सारथी'मार्फत आयोजित कॉमन इंट्रान्स टेस्ट (सीईटी) मध्ये प्राप्त गुणांवर आधारित केली जाते. सीईटी मधील गुणांकानुसार गुणवत्ता यादी 'सारथी'च्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येते. निकाल जाहीर झाल्यानंतर किमान १० दिवसाच्या आत विद्यार्थ्यांची पुणे येथील 'सारथी' कार्यालयात कागदपत्रे पडताळणी करण्यात येते. या पडताळणीसाठी उमेदवार कोणत्याही कारणास्तव गैरहजर राहिल्यास तो प्रवेशास पात्र राहत नाही. कागदपत्रे पडताळणी द्वारे पात्र विद्यार्थ्यांची १० दिवसाच्या आत प्रवेश प्रकिया पूर्ण करण्यात येते. लाभाचे स्वरूप महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षेच्या कोचिंगसाठी प्रवेश घेतलेल्या लाभार्थ्याचे कोचिंग शुल्क 'सारथी'मार्फत कोचिंग संस्थांना अदा केले जाते. लक्षित गटातील पात्र उमेदवारास पुणे येथील कोचिंग कालावधीतील कोचिंग वर्गातील किमान ७५ टक्के मासिक हजेरीच्या व किमान ३५ टक्के टेस्ट स्कोरच्या आधारे ८,००० रुपये विद्यावेतन प्रति माह प्रशिक्षण कालावधीमध्ये अदा करण्यात येते. पूर्वपरीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना मुख्य परीक्षेचा प्रशिक्षण कालावधीत कोचिंग वर्गातील किमान ७५ टक्के मासिक हजेरीच्या व किमान ३५ टक्के टेस्ट स्कोरच्या आधारे ८,००० रुपये विद्यावेतन प्रतिमाह प्रशिक्षण कालावधीमध्ये अदा करण्यात येते. 'सारथी' संस्थेच्या हीींिः// ीरींहळ–ारहरीरीहींीरर्सी.ळप/ या संकेतस्थळावर योजनेच्या अटी, शर्ती आणि पात्रता निकषांची सविस्तर माहिती उपलब्ध आहे.– तानाजी घोलप, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# पत्रकारिता ही भारतीय लोकशाहीची ढाल.

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे साधन आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.हा दिवस आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केल्या जाते.बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.म्हणुनच महाराष्ट्र सरकारने पत्रकार दिवस ६ जानेवारी या दिवशी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त घोषित केला आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्यात ६ जानेवारी हा मराठी पत्रकार दिवस म्हणुन साजरा केला जातो.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखान करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय.जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही. त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनु जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो.१९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतान्त्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन,वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया,ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात. पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो.वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात.यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते.आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्र्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात



झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्रहोय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी दर्पणमध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे.यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदीटिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही ईजा येवु दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे.देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम करतो आणि मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो.जय हिंद!

-----------------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

---

### दैनिक अभिमान, महाराष्ट्र प्रतिमा, या वृत्तपत्रामध्ये चुकीच्या बातम्या प्रसारित झाल्यामुळे परिचारिका संवर्गाची नाहक बदनामी करणाऱ्या बातमीचे शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्याचे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, वृत्तपत्रांना आवाहन

लातूर :- ०५ जानेवारी२०२४ रोजी दैनिक अभिमान, दैनिक महाराष्ट्र प्रतिमा, या बीड जिल्ह्यातून प्रसारित होणाऱ्या वृत्तपत्रातील बातम्या बीड जिल्ह्यातून प्रसारित होणारे वृत्तपत्र - दैनिक अभिमान, दैनिक महाराष्ट्र प्रतिमा, या वृत्तपत्रामध्ये गेवराईत अवैध गर्भपात करणारी टोळी जेरबंद, जामिनावर सुटलेल्या नर्सने गर्भपाताचा बाजार उठवला या मथळ्याखाली चुकीची बातमी प्रसारित करण्यात आली आहे.

परंतु दैनिक संकेत मधील प्रसारित करण्यात आलेल्या बातमीमध्ये जामिनावर सुटलेल्या अंगणवाडी सेविका व डॉक्टरचा उल्लेख केलेला आहे. सदर चुकीच्या बातमी मुळे परिचारिका संवर्गाची सर्वत्र नाहक बदनामी होत आहे. कसलीही शहानिशा करता प्रकाशित केलेल्या बातमीमुळे परिचारिकांच्या भावना दुखावल्या जात असून यामुळे, राज्यातील परिचारिका मध्ये संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर ही राज्यातील परिचारिकांची एकमेव शासनमान्य संघटना असून सदर घटनेची शहानिशा करून पुन: शुद्धीपत्रक प्रसारित केल्यास परिचारिका संवर्गाची प्रतिमा नाहक मलिन होणार नाही. तसेच केवळ महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडे नोंदणीकृत असलेली परिचारीका हीच अधिकृत परिचारीका समजावी. असे नम्र आवाहन राज्यकार्याध्यक्ष अरुण कदम व राज्यसरचिटणीस सुमित्रा तोटे यांनी सर्व वृत्तपत्रांना केले.

---

# १२१ किलोच्या इन्फ्लुएन्सर तरुणीने पालटलं रूप; ४० किलो वजन कमी करतानाचा डाएट व 'चीट डे' ची हॅक केली शेअर

पलकने वजन कमी करायचं ठरवलं तेव्हा तिने इतकं परफेक्ट रुटीन आखलं की कोणताही फॅड डाएट फॉलो न करता, शॉर्टकटच्या नावे जास्त श्रम न घेता, जिममध्ये शरीराची झीज न करता तिने १, २ नव्हे तर तब्बल ४० किलो वजन कमी केलं आहे.४०ज्ञस थशळसहीं ड्डी: नवीन वर्षाच्या संकल्पांची यादी करताना तुमचं वजन नियंत्रणात ठेवणं हा जर तुमचाही संकल्प असेल तर आजचा हा विशेष लेख तुम्हाला काही भन्नाट आयडीयाज व प्रेरणा सुद्धा नक्की देऊ करेल. शेफ व इन्फ्लुएन्सर पलक कपूर हिने इंडियन एक्सप्रेससह ४० किलो वजन कमी करण्याचा प्रवास शेअर करताना आपल्याला आलेल्या अडचणी व त्यावर शोधलेले उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. तुमच्या आमच्यासारखीच खाण्याची आवड असलेली पलक सांगते की, मला बटर चिकन एवढं आवडायचं की मी 'नेहमी' बटर नानबरोबर त्याच्यावर ताव मारायचे, चार- पाच बटर नान फस्त करायचे. पण जेव्हा पलकने वजन कमी करायचं ठरवलं तेव्हा तिने इतकं परफेक्ट रुटीन आखलं की कोणताही फॅड डाएट फॉलो न करता, शॉर्टकटच्या नावे जास्त श्रम न घेता, जिममध्ये शरीराची झीज न करता तिने १, २ नव्हे तर तब्बल ४० किलो वजन कमी केलं आहे.वजन वाढण्याचं कारण म्हणजे तुम्ही 'कशासाठी' खाताय?पलकने वजन कमी करण्याचा प्रवास आपल्या इन्स्टाग्राम, युट्युबच्या माध्यमातून सुद्धा चाहत्यांसह शेअर केला आहे. ती सांगते की, एकेकाळी तिचं वजन १२१ किलो होतं. आता तिचं वजन साधारण ८० किलो आहे पण अजूनही तिच्या उंचीप्रमाणे वजन कमी करण्यासाठी तिचा प्रयत्न सुरु आहे. खवय्या कुटुंबात जन्मल्यामुळे तिने करिअर सुद्धा खाण्यापिण्याशी संबंधित निवडलं. मात्र अचानक हृदयविकाराच्या झटक्याने वडिलांचे निधन झाल्यावर परिस्थिती बदलू लागली. आवडीमुळे होणारी खवय्येगिरी दु:ख आणि एकटेपणा दडपण्यासाठी फक्त शरीरात कॅलरीज व घातक घटक कोंबण्यापर्यंत बदलली. तिच्या मेंदूला खाण्यामुळे डोपामाइन मिळू लागला याची सवय झाल्यामुळे, तिने तिच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष केले होते.एप्रिल २०२० च्या एका सकाळी, छातीत खूप जळजळ आणि तोंडात कडू आम्लयुक्त चव घेऊन पलकला जागा आली. काही दिवस असंच चालू राहिलं. मग मनात वडिलांप्रमाणेच हृदयविकाराचा झटका येण्याची भीती वाढू लागली. त्यात 'लठ्ठपणा' हा एक कौटुंबिक वारसा आणि जोखीम घटक होता त्याने तिला अधिकच अस्वस्थ वाटू लागलं.वजन कमी करताना पहिले काय बदललं?अशातच करोनाच्या, लॉकडाऊनमध्ये घरात अडकून पडल्याने वजन कमी करायचं म्हटलं तरी कसं करावं हा प्रश्न मोठा होता. यामुळेच तिने आपल्या आहारातच काही बदल करण्याचं ठरवलं. सगळ्यात आधी मी फोनमध्ये सर्व फूड ॲप्स काढून टाकले.ग्रील्ड चिकन, पनीर आणि फरसबी यांसारख्या निरोगी प्रथिनांना आहारात जागा करून दिली आणि त्याऐवजी जड व अधिक कॅलरीजयुक्त पदार्थ वगळण्यास सुरुवात केली. मी दुपारच्या जेवणासाठी भात खात होते पण त्याचे प्रमाण कमी केले, पोट भरल्याचा आनंद मिळवता म्हणजं काकडी आहारात सर्वाधिक समाविष्ट केली. रात्रीच्या जेवणासाठी चपातीच्या आकाराच्या दोन बाजरीच्या भाकऱ्या घेतल्या.इनडोअर फिटनेससाठी, ती एक दिवसही न डगमगता, दररोज ३०-४० मिनिटे वेगाने चालायची. कधी यातच बदल म्हणून पायऱ्या चढण्याचा उतरण्याचा पर्याय निवडला. यूट्यूबवरून होम फिटनेस रूटीनचे फॉलो करून, तिने २०२० च्या अखेरपर्यंत १० किलो वजन कमी केले.अचानक कोविडची लागण झाली आणि..एकदा तिचे वजन कमी झाल्याचे दिसू लागल्यावर पलकने इंटरमिटंट फास्टींग करायला सुरुवात केली. दुपारी ३ ते रात्री ९ या वेळेत ती आहार घेऊ लागली.

---

# मराठी भाषेतील पहिले पत्रकार बाळशास्त्री जांभेकर..!

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी कोकणातील वाघोटन घाटीच्या किनारी असलेल्या पोभुर्ले या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाधर शास्त्री व आईचे नाव सगुनाबाई असे होते. बाळशास्त्री हे लहानपणापासूनच बुद्धीजीवी व हुशार असल्याने त्यांना त्यांच्या वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांनी संत तुकाराम महाराज, मोरापंत, रामदास व वामन यांच्या कविता आणि संस्कृत गीता पठण पद पठण व पंचकव्याचा चांगला अभ्यास केला होता. इसवी सन य१८२५मध्ये ते मुंबईला आले. त्यांनी इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला आणि गणित विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळवल्याने त्यांनी शिक्षण घेत असतानाच गणिताचे अध्यापक म्हणून काम केले .त्या बदल्यात त्यांना पंधरा रुपये पगार मिळायचा मराठी भाषेसह इंग्रजी गुजराती बंगाली व फारशी भाषावर सुद्धा त्यांनी प्रभुत्व मिळवलं इ.स.१८३० मध्ये बाळशास्त्री जांभेकर बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये डेप्युटी सचिव झाले. त्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषविली अक्कलकोटच्या युवराजचे शिक्षक, एफलिस्टन महाविद्यालय पहिले सहाय्यक प्राध्यापक, जुनिअर कॉलेज स्कूलचे प्राचार्य, कुलबा वेधशाळेचे संचालक ,तात्कालीन मुंबईच्या कोर्टाच्या सदस्य, जस्टीस ऑफ पीस मुंबईचे सदस्य व कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी अशी अनेक महत्त्वाची पदे बालशास्त्री जांभेकर यांनी आपल्या विद्वत्तेच्या जोरावर भूषविली होती. बाळशास्त्री जांभेकर यांनी १९ व्या शतकात महाराष्ट्रात घडून आलेल्या समाजप्रबोधनाचे अग्रदूत म्हणून मोठी मोलाची कामगिरी केली. त्यांनी समाज सुधारक पत्रकार इतिहास संशोधक लेखक व एक शिक्षण प्रसारक म्हणूनही कार्य पार पाडले. ब्रिटिश सरकारच्या काळात



कलकत्ता, मद्रास ,चेन्नई मुंबई येथे इंग्रजी वृत्तपत्राची सुरुवात झाली. परंतु भारतीय जनतेच्या अस्तित्वाला या वृत्तपत्रात कोठेही विशेष स्थान देण्यात येत नव्हते. इंग्रजी भाषेत वृत्तपत्रे निघतात. तर भारतीय भाषेतही अशी वृत्तपत्रे काय निघू नयेत या प्रश्नाने बाळशास्त्री जांभेकर चिंतेत होते. भारतीय समाजात नवीन वैचारिक जागृती आणि नवीन जाणीव निर्माण करण्यासाठी दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर या विद्वानांन दर्पण च्या रूपाने पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले .मुंबईत जांभेकरांनी दर्पणच्या माध्यमातून सुरू केलेली वैचारिक प्रबोधनाची पेरणी मराठी भूमीत रुजवण्याचा प्रामाणिक प्रयत्न बाळशास्त्री जांभेकर यांनी केला . त्यांनी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून निसर्ग ,समाज, व्यक्ती, अंधश्रद्धा देशभक्ती इत्यादी विषयावर आधारित कविताही प्रकाशित केल्या. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रीच्या हातातील एक लोक शिक्षण आणि समाज प्रबोधनाचा माध्यम त्यांनी त्याचा उत्तम वापर समाज जागृती आणि प्रबोधनासाठी करून घेतला. ज्ञान बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत होत्या. ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा ही त्यांची तळमळ होती. देशाची प्रगती आधुनिक विचार आणि संस्कृतीचा विकास यासाठी वैज्ञानिक ज्ञानाची अत्यंत गरज आहे तसेच सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याचा वेग निष्ठा आणि प्रखर भूमिकेसाठी शास्त्रीय ज्ञानाची प्रसाराची आवश्यकता आहे याची जाणीव त्यांना झाली होती. विज्ञाननिष्ठ मानावी समाज उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते .म्हणून अंधश्रद्धा, जातीभेदाचा प्रश्न , भारतीय स्त्रियांच्या शिक्षणाची दिशा, स्त्रि- पुरुष , समान हक्क, सरकारी नोकरीत जातीयता, विधवांच्या पुनर्विहाचा प्रश्न या विषयावर त्यांनी दर्पण मधून आपले रोखठोक पुरोगामी विचार मांडले त्यामुळे समाजात जनजागृती होण्यास मदत झाली. बाळशास्त्री जांभेकर यांच्या या पुरोरामी विचारामुळे दर्पण विषयी लोकांचे आकर्षणही हळूहळू वाढले. सार्वजनिक ग्रंथालयाचे महत्त्व ओळखून त्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. विविध समस्यावर सकस चर्चा घडवण्यासाठी नेटिव्ह इम्प्रूमेंट सोसायटीची स्थापना केली. यातूनच पुढे स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी या संस्थेला प्रेरणा मिळाली.१८४० मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी दिग्दर्शन या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरुवात करून या मासिकाचे संपादक म्हणून ५ वर्षे काम पाहिले या मासिकातूनही त्यांनी इतिहास ,भूगोल, रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, निसर्ग विज्ञान, आधी विषय नकाशे व आकृत्याच्या साह्याने प्रसिद्ध केले. हे या अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलन क्षमता वाढवण्याचा प्रयत्नही केला. बाळशास्त्री जांभेकर यांनी देशाला महत्त्वपूर्ण योगदान दिले .त्यांच्या काळात समाज बहुसंख्येने निरक्षर, अंधश्रद्धाळू व अज्ञानी होता. म्हणूनच अवघ्या काही वर्षाच्या आयुष्यात विविध क्षेत्रात त्यांनी केलेलं प्रचंड कार्य अद्भुत ठरते. ६ जानेवारी रोजी दर्पण या मराठी वृत्तपत्राचा चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हाच योगायोग बाळशास्त्रींचाही जन्मदिनाचे अवचित साधून पत्रकार दिन म्हणून आज महाराष्ट्रात साजरा केला जातो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा प्रामाणिक वापर केला .त्याचबरोबर जातीभेद निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिले ,त्यामुळे त्यांचा उल्लेख आद्य समाज सुधारक असा केला जातो. आज६ जानेवारी पत्रकार दिन त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला विचाराला विनम्र अभिवादन...

-------------

**मु. पो .वडनेर भोलजी**
**ता. नांदुरा जि. बुलढाणा**
**मो. नं.९३०९७६७३८८**

# जलजीवन मिशन किनवट तालुक्यात जल ही झाले गुत्तेदाराचे जीवन .!

किनवट / शेख शौकत :- योजना गोरगरिबांसाठी की गुत्तेदारांचा सर्वांगीण विकासासाठी.? भारत सरकारच्या वतीने आणि महाराष्ट्र सरकारने एकत्रित रित्या सर्वसामान्य गोरगरीब जनतेचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायस्वरूपी मिटावा यासाठी मोठा गाजावाजा करत जवळ जवळ प्रत्येक गावात जलजीवन मिशन योजनेचे काम धूमधडाक्यात चालू केलेले आहेत.ज्या कामासाठी १ रुपया लागत असतो त्याचं कामासाठी शासनाने दिड रुपया मंजूर केला आहे.म्हणजे एकप्रकारे सर्व सामान्य जनतेचा पैसा उधळला जातो आहे असेच दिसतं आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे किनवट तालुक्यातील ७ किमी अंतरावर असलेल्या भुलजा या गावात करण्यात आलेले जलजीवन मिशन योजनेचे काम होय.मुळात अंदाजे ५०० लोकसंख्या असलेल्या या गावात मोजून ९० घरे आणि कामासाठी शासनाने निधी मंजूर केला ७६ लक्ष रुपयांचा आणि कामही जवळ जवळ पूर्ण केले आहे.सर्व साधारणपणे एक बोअर आणि त्यात मोटार टाकली तर त्याला ३० हजार रुपये लागतात म्हणजे गावातील प्रत्येक घरात एक बोअर जरी मारला असता तर त्याला पूर्णत एकूण सत्तावीस लाख रुपयांत काम पूर्ण झाले असते




किंवा गावातील चार कोपऱ्यात एक बोअर आणि त्या जवळ एक ५ हजार लिटरची पाण्याची टाकी आणि त्यातून प्रत्येक घरात नळ कनेक्शन दिले असते तर जास्तीजास्त १० लक्ष रुपयांत सर्व गावातील प्रत्येक घराची पाण्याची समस्या कायम स्वरुपी मिटली असती आणि भविष्यात त्यावर कोणताच खर्च करण्याची गरज पडली नसती.अर्थात सर्व सामान्य जनतेचा पैसा उधळला गेला आहे आणि गुत्तेदारचा सर्वांगीण विकासाची सोय केल्याची दिसतं आहे. गुत्तेदार ने मोठ्या दिमाखात जे काम केले आहे ते इतके निकृष्ट दर्जाचे आहे की पाण्याची टाकी टेस्टिंग करतानाच गळायला लागली आहे आणि गावात घरोघर बसवलेले नळ त्याला पाणी येण्या आधीच मान टाकून देत आहेत.खुद्द गावचे सरपंच आणि सदस्य यांचा घरातील नळ बघितले तर लख लखं हालत आहेत एवढे ते दिकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे.आणि त्या निकृष्ट दर्जाचा आणि बोगस कामावर शासनाने ७६ लक्ष रुपयांची उधळण केली आहे.येवढ्या पैशांची खरंच तिथे आवश्यकता होती का.?आणि असेल तरही काम तर चांगले करावे असे गावातील सुज्ञ नागरिकांनी बोलून दाखवले.

या बोगस आणि निकृष्ट दर्जाचा कामाची चौकशी करण्याची मागणी गावातील सामाजिक कार्यकर्ते दर्शन साळवे यांनी लेखी निवेदन देत केली आहे परंतु त्यांचा पत्राला अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली आहे. आणि बोगस कामाला प्राधान्य दिलेले आहे.सदरील प्रकरणी पारदर्शक चौकशी होणारं नसेल तर २६ जानेवारी रोजी तीव्र आंदोलनाचा इशारा गावातील लोकांनी बोलून दाखविला आहे.

# डॉ. जगदीश कदम यांचे लातूरात स्वागत

लातूर -जेष्ठ साहित्यिक तथा ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जगदीश कदम हे नांदेड वरून कोल्हापूरला जात असताना लातूर येथे साने गुरुजी संकुलात सकाळी गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी त्यांच्यासोबत दैनिक श्रमिक एकजूटचे संपादक कृष्णा शेवडीकर, लेखक भगवान अंजनीकर व प्रकाशन निर्मलकुमार सूर्यवंशी नांदेड यांचाही सत्कार गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य,शिक्षक नेते कालिदास माने, महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवतप्पा उबाळे, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य सचिव प्रा. यु. डी. गायकवाड,लातूर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक देडे,माजी मंडळ अधिकारी सुरेश सोनकांबळे,शिक्षक काँग्रेस जिल्हाध्यक्ष दयानंद बिराजदार यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी डॉ. जगदीश कदम यांच्यासह सर्व मान्यवरांनी फेब्रुवारीच्या महिन्यात लातूर येथे होणाऱ्या शिक्षक साहित्य संमेलनाचे निमंत्रण स्वीकारून उपस्थित राहण्याची कबुली ही दिली.

या कार्यक्रमास साने गुरुजी संकुलाचे प्रशासकीय अधिकारी जी.टी.माने,प्राचार्य चव्हाण,मुख्याध्यापक राऊत,केंद्रे,जाधव व सुरज निगम आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या वतीने आज दर्पणकार पुरस्काराचे मान्यवरांच्या शुभहस्ते शानदार वितरण होणार

**या मान्यवरांच्या शुभहस्ते होणार पुरस्काराचे वितरण**

पुरस्कार प्राप्त पत्रकार यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ सन्मानपत्र सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे हा सन्मान आमदार संदीप भैया क्षीरसागर, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, एसडीओ कश्मीरा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक बडे या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार वितरण सोहळा.

बीड / प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने दर्पण दिना निमित्त आज शनिवार दिनांक ६ जानेवारी रोजी स.मा.गर्गे भवन येथे मान्यवरांच्या शुभहस्ते बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या पुरस्कार सोहळ्याचे शानदार वितरण होणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास पत्रकारांसह पत्रकार प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली, पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज शनिवार दिनांक ६ जानेवारी २०२४ रोजी बीड येथील स.मा.गर्गे भवन, तुळजाई चौक, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या पाठीमागे,बीड येथे सकाळी ११ वाजता बाळशास्त्री जांभेकर दर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे.




दर्पण दिनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या नामांकित पुरस्काराने यावर्षी बीडचे भूषण म्हणून पश्चिम भारताचे पीटीआय प्रमुख विलास तोकले, मराठी दर्पणकार म्हणून सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावस्कर, उर्दू दर्पणकार दैनिक तामिरचे संपादक मकदूम काझी, इंग्रजी दर्पणकार म्हणून लोकमत टाइम्सचे जिल्हा प्रतिनिधी सी आर पटेल, हिंदी दर्पणकार दैनिक लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, इलेक्ट्रॉनिक मीडिया दर्पणकार म्हणून टीव्ही ९ चे महेंद्र मुधोळकर, न्यूजपोर्टल सोशल मीडिया दर्पणकार संग्राम धनवे, युट्युब सोशल मीडिया दर्पणकार संतोष ढाकणे आणि अब्दुल कलाम वैचारिक दूत पुरस्काराचे मानकरी आष्टी येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते भीमराव गुरव या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे बीडचे आमदार संदीप भैया क्षीरसागर,निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, एसडीओ कश्मिरा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक बडे या मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या शानदार पुरस्कार सोहळ्यास आणि दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव,भगिनी, पत्रकार प्रेमी नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.

# विधी पळसापुरे यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार जाहीर

लातूर : प्रतिनिधी भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयतर्फे देण्यात येणा-या राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी लातुरच्या विधी पळसापुरे यांना जाहीर झाला आहे. येत्या १२ जानेवारी रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नाशिक येथे पार पाडणा-या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.विधी पळसापूरे या माझा करिअर गाईड फाउंडेशनच्या संस्थापिका असून सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. गेल्या ८ वर्षांपासून विधी सातत्याने विविध विकास कामे करत असून, शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या नि:शुल्क करिअर मार्गदर्शनाचे कार्य त्या करत आहेत. या आधी २ ऑक्टोबर रोजी देशाच्या संसदेतील त्यांचे भाषण सबंध महाराष्ट्रात लोकप्रिय झाले होते. लातूरचे नाव देश पातळीवर पुन्हा एकदा गाजविल्या मुळे विधी व त्यांच्या आई, वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दि. ३० डिसेंबर रोजी उदगीर येथे झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय युवा महोत्सवात क्रीडा व युवक सेवा संचालनालयचे मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते विधी पळसापुरे यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. या वेळी खासदार सुधाकरजी शृंगारे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# भाजप लातूर ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षपदी आतिश कांबळे यांची निवड जिल्हाध्यक्ष देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

लातूर :- लातूर येथील भाजप मधील सक्रिय कार्यकर्ते अतिश कांबळे यांची आज दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी. भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन गरुड चौक रिंग रोड कार्यालय येथे नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी नूतन लातूर ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष य कांबळे यांनी आपल्या संघटन कौशल्याने जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचे संघटन वाढविण्यासाठी अथक परिश्रम करावे




अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे आशुतोष बनसोडे, प्रमोद मस्के मनोज मोहीते, ऋषी डोंगरे सह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भिम आर्मी चे अक्षय धावारे यांच्या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानीत

लातूर /प्रतिनिधी :- ०५ जानेवारी रोजी युवा भिम सेना सामाजिक संघटना सोलापूर चा ०६ वा वर्धापनदिनानिमित्त सामाजिक क्षेत्रात कार्य करत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांना सामाजिक कार्यकर्ता या पुरस्काराने सन्मानीत करून समाजात कार्यकरणाऱ्या कार्यकर्त्यांची दखल युवा भिम सेना सामाजिक संघटनचे संस्थापक अध्यक्ष महेश आण्णा डोलारे यांनी घेतली यावेळी भिम आर्मी भारत एकता मिशन चे महाराष्ट्र प्रदेश संघटक अक्षय धावारे यांच्या कार्याची दखल



सुध्दा घेण्यात आली अन्याय अत्याचारांना वाचा फोडणे गोर गरीब समाजाला न्याय मिळवून देणे शासकीय रूग्णालय असो किंवा पोलीस स्टेशन शाळा असो किंवा कॉलेज गरजुवंताच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणार नेतृत्व कोरोना काळात सुध्दा स्व:ताच्या जिवाची पर्वा न करता अहोरात्र कोरोनाग्रस्त पेशंटसाठी त्यांच्या नातेवाईकांसाठी धाऊन जाणारा एक ध्येयवेडा आंबेडकरी चळवळीत शेकडो गुन्हे अंगावर घेण्याची तयारी प्रश्न मार्गी लावण्याची जिद्द असणारा प्रामाणिकपणे कार्य करणारा फुले शाहू आंबेडकर यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी झगडणारा संघर्षवादी अक्षय धावारे यांच्या कार्याची दखल युवा भिम सेना सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेश आण्णा डोलारे यांनी घेऊन राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

# सोलापूरकरांनी हाताने विणलेले वस्त्र प्रभू श्रीरामांच्या मूर्तीला घालण्यात येणार

सोलापूर (प्रतिनिधी ) : शेकडो वर्षानंतर आयोध्या मध्ये प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. त्या मूर्तीसाठी सोलापूरकरांनी हाताने विणलेले वस्त्र प्रभू श्रीरामांच्या मूर्तीला घालण्यात येणार आहे. हे आपणा सर्वांसाठी भाग्याचे लक्षण आहे. त्यामुळे सोलापूरकरांनी विवेकानंद केंद्राच्या ‘धागा विणूया श्रीरामासाठी’ या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले. या उपक्रमाचा शुभारंभ आज करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, वालचंद शिक्षण समूहाचे प्रमुख डॉ. रणजीत गांधी, आमदार सुभाष देशमुख, उद्योजक व केंद्राचे नगर संचालक दीपक पाटील, चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष राजू राठी, सोलापूर जिल्हा यंत्रमाग संघटनेचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. शोभाताई शहा आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम ५ ते १४ जानेवारी दरम्यान वालचंद महाविद्यालय समोरील श्री पंचमुखी हनुमान मंदिर येथे चालणार आहे. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत हा उपक्रम चालणार असून सर्व सोलापूरकरांनी यात सहभागी होण्याचे आवाहन विवेकानंद केंद्रातर्फे करण्यात आले.सोलापुरातून हाताने विणले जाणारे वस्त्र प्रभू रामचंद्राला अर्पण होणार आहेत. या उपक्रमात तयार झालेले वस्त्र प्रभू श्री रामांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सदर उपक्रमास अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोशाध्यक्ष स्वामी श्री गोविंद देव गिरी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.यावेळी धवल भाई शहा, रंगनाथ बंकापुरे, अंबादास नक्का, ज्ञानेश्वर म्याकल, पंचमुखी हनुमान मंदिराचे विश्वस्त राजमहिंद्र कमटम, सत्यनारायण गुर्रम, विवेकानंद केंद्राचे सर्व कार्यकर्ते, महाविद्यालय तरुण तरुणी, यंत्रमाग कामगार आणि नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना पोलिसांचे आकर्षण; शस्त्रांचे कुतूहल

लातूर : प्रतिनिधी महाराष्ट्र पोलिस स्थापना दिवस अर्थात ‘रेझिंग डे’च्या निमित्ताने जिल्हा पोलिस दलाच्या वतीने येथील जिल्हा क्रीडा संकुलात गुरुवार दि. ४ जानेवारीपासून तीन दिवसीय शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांत शहरातील हजारो विद्यार्थ्यांनी पोलिस यंत्रणा कसे कामाकाज करते, त्यांच्याकडे कोणकोणते विभाग आहेत. त्यांच्याकडे असलेल्या अत्याधुनिक शस्त्रांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या मनात पोलिसां विषयीचे आकर्षण तर शस्त्रांचे कुतूहल असल्याचे त्यांच्या चेह-यांवरुन दिसून येत होते.पोलिस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलिस अधीक्षक डॉ. अजय जेवरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा संकुलात ४ ते ६ जानेवारी या कालावधीत पोलिस प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात जिल्हा पोलीस दलाकडे असलेल्य अत्याधुनिक शस्त्रांचे प्रदर्शन मुलांचे आकर्षण व कुतूहलाचा विषय ठरत आहे. या प्रदर्शनात डॉग स्कॉड, इन्वेस्टिगेशन व्हॅन, बॉम्ब शोध व नाशक पथक, अत्याधुनिक वाहने, सायबर कक्ष, वाहतूक सुरक्षा, वायरलेस यंत्रणा, सुरक्षा हेल्पलाइन, असे अनेक विभागाचे स्टॉलस् भरवण्यात आले आहेत. प्रदर्शनाच्या ठिकाणी एकुण १० स्टॉलस् आहेत. पोलिस यंत्रणेची शालेय विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, हा या मागणचा उद्देश आहे. या प्रदर्शनाला जयक्रांती विद्यालय, श्री देशिकेंद्र विद्यालय, पोदार स्कूल, सरस्वती विद्यालय, उर्दू शाळांसह शहरातील जवळपास सर्वच शाळांतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी भेट देऊन प्रदर्शनाची स्टॉलस्ची पाहणी केली.

# मराठा समाज व खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणासाठी घरोघरी येणाऱ्या सर्वेक्षकांना सहकार्य करावे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर दि. ५ (जिमाका): महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने युद्ध पातळीवर तयारी केली आहे. या मोहिमेत एकही कुटूंब वंचीत राहणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यात सर्वेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या या सर्वेक्षकांना आवश्यक माहिती देवून सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. शहरी आणि ग्रामीण भागात सर्वेक्षणासाठी अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून गरज पडली तर आणखी मनुष्यबळ वाढविले जाणार आहे. तसेच सर्वेक्षण कालावधीत कोणीही मुख्यालय सोडणार नाही, अशी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. महानगरपातळीवर मनपाचे आयुक्त, वार्ड निहाय अधिकारी-कर्मचारी यांच्यावर सर्वेक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे. तालुकापातळीवर महसूल यंत्रणा, संबंधित नगरपरिषदा तर ग्रामीण भागात ग्रामपंचायती, पंचायत समिती यांच्या समन्वयातून हे सर्वेक्षण युद्धपातळीवर विहित कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. सर्वेक्षणाला नागरिकांचे सहकार्य अपेक्षित असून प्रशासनाने नियुक्त केलेले सर्वेक्षक घरी आल्यानंतर त्यांना आवश्यक माहिती देवून सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. तसेच यामध्ये स्वयंसेवी संस्थांनीही प्रशासनला सहकार्य करावे, असे त्यांनी म्हटले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE